


शब्दांना सत्याची धार

# प्रहार

मुंबई • शुक्रवार, २३ जानेवारी २०२६ | मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध • वर्ष २२ • अंक १०६ • पाने १० • ₹ ५.०० | www.prahaar.in epaper.prahaar.in

भारताचे विजयी आघाडीकडे लक्ष्य

पान : क्रीडा








## वेचक

### श्री जगन्नाथ मंदिरात बॉम्बस्फोट करण्याची धमकी

**नवी दिल्ली :** ओडिशा राज्यातील प्रसिद्ध धार्मिक स्थळ पुरी येथील श्री जगन्नाथ मंदिर परिसरात बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी देण्यात आली आहे. बुधवारी (ता. २१) श्री जगन्नाथ मंदिर ग्रँड सेंटर मार्केटमध्ये बॉम्बस्फोट केला जाईल अशी धमकी आली होती. सोशल मीडियावरील एका पोस्टमुळे पुरी पोलिसांची धावपळ उडाली आहे. धमकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी श्री जगन्नाथ मंदिर परिसरासह पुरी शहरातील इतर संवेदनशील ठिकाणी सुरक्षा व्यवस्था वाढवली आहे. 'श्री जगन्नाथ मंदिरासह इतर संवेदनशील ठिकाणची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. मंदिर परिसरात स्पेशल टास्क युनिट (एसटीयू) आणि श्रीमंदिर सुरक्षा दलाचे जवान तैनात करण्यात आले आहेत. या धमकीचा तपास करण्यासाठी वरिष्ठ आणि अधिकाऱ्यांचे पथक नेमण्यात आले आहे', अशी माहिती पुरीचे एसपी प्रतीक सिंग यांनी दिली.

### वाशी नाका परिसरात आठ सिलिंडर्सचा स्फोट

**नवी मुंबई :** नवी मुंबई परिसरातील वाशी नाका परिसरात एकामागोमाग एक अशा अनेक सिलिंडरचा स्फोट झाल्याची घटना घडली. सिलिंडरच्या स्फोटांच्या मोठ्या आवाजामुळे परिसरात एकच खळबळ पसरली आहे. मुंबई-गोवा हायवेवरील वाशी नाका परिसरात सिलिंडरने भरलेल्या पिकअप टेम्पोला अचानक आग लागली. या पिकअप टेम्पोमध्ये आठ गॅस सिलिंडर होते. गाडीने पेट घेताच एकामागोमाग एक सिलिंडरचा स्फोट झाला. ज्यामुळे काही क्षणांतच संपूर्ण वाहन जळून खाक झाले. या घटनेची माहिती मिळताच तातडीने घटनास्थळी अग्निशमन दलाच्या गाड्या दाखल झाल्या असून अग्निशमन दलाने वेळेत आगीवर नियंत्रण मिळवले.

# मुंबई, पुण्यासह १५ महापालिकांवर

# महिला कारभारी

## महापौरपदाची आरक्षण सोडत जाहीर; सत्तेची दिशा स्पष्ट झाल्याने राजकीय हालचालींना वेग, कल्याण-डोंबिवलीत संभाव्य उमेदवार अज्ञातस्थळी

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

राज्यातील महापालिकांच्या सत्तासमीकरणांना नवे वळण देणारी महापौरपदाची आरक्षण सोडत गुरुवारी जाहीर झाली. मुंबई, पुण्यासह तब्बल १५ महापालिकांमध्ये महापौरपद महिलांसाठी राखीव झाल्याने राजकीय हालचालींना वेग आला आहे. कल्याण-डोंबिवलीत अनुसूचित जमातीसाठी आरक्षण जाहीर झाल्यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून संभाव्य उमेदवारांना अज्ञातस्थळी नेण्यात आले आहे.

राज्यातील २९ महापालिकांच्या महापौरपदासाठीची आरक्षण सोडत गुरुवारी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत मंत्रालयात काढण्यात आली. या सोडतीनुसार अनुसूचित जाती प्रवर्गासाठी तीन, अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी एक, इतर मागासवर्गीय प्रवर्गासाठी आठ, तर उर्वरित १७ महापालिकांमध्ये महापौरपद खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. या आरक्षणामुळे अनेक शहरांतील विद्यमान राजकीय गणिते बदलली असून, सर्वच पक्षांना नव्या महिला नेतृत्वाला पुढे आणावे लागणार आहे.

राज्यातील २९ महापालिकांपैकी मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नवी मुंबई, नाशिक, मीरा-भाईंदर, भिवंडी-निजामपूर, मालेगाव, धुळे आणि नांदेड येथे खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण महिला आरक्षण जाहीर झाले आहे. ठाणे महानगरपालिकेत अनुसूचित जाती प्रवर्गासाठी, तर कल्याण-डोंबिवली महापालिकेत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी महापौरपद आरक्षित झाले आहे. उल्हासनगर, पनवेल, अहिल्यानगर, जळगाव, अकोला, चंद्रपूर, कोल्हापूर आणि इचलकरंजी या महापालिकांमध्ये ओबीसी प्रवर्गासाठी आरक्षण निश्चित झाले आहे. नागपूर, अमरावती, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि वसई-विरार येथे खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण आरक्षण लागू झाले आहे.

महिला महापौर असणाऱ्या महापालिकांची संख्या मोठी असल्याने राज्याच्या शहरी राजकारणात महिला नेतृत्व अधिक प्रभावीपणे पुढे येणार आहे. अहिल्यानगर, जळगाव, अकोला आणि चंद्रपूर येथे ओबीसी महिला महापौर असतील, तर लातूर आणि नव्याने स्थापन झालेल्या जालना महानगरपालिकेत अनुसूचित जाती प्रवर्गातील महिलांसाठी महापौरपद राखीव ठेवण्यात आले आहे.



छाया : अरुण पाटील

**कल्याण-डोंबिवलीत राजकीय घडामोडींना वेग**

■ दरम्यान, कल्याण-डोंबिवलीचे महापौरपद अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आरक्षित झाल्याचे स्पष्ट होताच राजकीय घडामोडींना वेग आला आहे. या प्रवर्गातील नगरसेवकांना विरोधी पक्षांकडून फूस लावली जाऊ नये, यासाठी शिवसेनेने तातडीने हालचाली सुरू केल्या. शिवसेनेचे कल्याण शहर अध्यक्ष रवी पाटील यांनी पात्र नगरसेवकांना 'अज्ञात स्थळी' हलवले.

■ या प्रवर्गातून शिवसेनेचे किरण भांगले आणि हर्षाली मोरे हे दोनच नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे महापौरपदासाठी यांच्यातच स्पर्धा होण्याची शक्यता असून, त्यांना विरोधी पक्षांकडून प्रस्ताव येऊ शकतात, असा अंदाज व्यक्त केला जात होता. ही शक्यता गृहीत धरूनच नगरसेवकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आल्याचे बोलले जात आहे.

### एकनाथ शिंदे यांच्या ठाण्याचे चित्र काय?

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ठाण्यात ७५ जागा जिंकून एकहाती वर्चस्व मिळवले आहे. त्यामुळे महापौर शिवसेनेचाच होणार हे स्पष्ट असले, तरी आरक्षणाच्या चिठ्ठीमुळे कोणत्या चेहऱ्याला संधी मिळेल, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. ठाणे पालिकेत अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षण जाहीर होताच शिवसेनेच्या गोटात हालचाली तीव्र झाल्या असून इच्छुकांनी फिल्डिंग लावण्यास सुरुवात केली आहे. ठाणे महापालिकेच्या महापौरपदासाठी पद्मा भगत, डॉ. दर्शना जानकर यांची नावे चर्चेत आहेत. दर्शना जानकर या पहिल्यांदाच निवडून आल्या असल्या, तरी कौटुंबिक पार्श्वभूमी राजकीय असल्याने त्यांना संधी मिळण्याची शक्यता आहे.

**मुंबईत कोणाला मिळणार संधी? :** मुंबई महापालिकेत खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण महिला आरक्षण जाहीर झाल्याने राजकीय हालचालींनाही वेग आला आहे. महापौरपदासाठी तेजस्वी घोसाळकर, योगिता कोळी, प्रीती सातम, अलका केरकर, स्वप्ना म्हात्रे, साक्षी दळवी, अर्चना भालेराव, अश्विनी मते, राखी जाधव, रितू तावडे, राजेश्री शिरवाडकर, शीतल गंभीर आणि हर्षिता नार्वेकर अशी नावे चर्चेत असून, अंतिम निर्णय पक्षीय गणितांनुसार घेतला जाणार आहे.

### २९ महानगरपालिकांचे आरक्षण

- **मुंबई** - खुला प्रवर्ग - सर्वसाधारण (महिला)
- **नवी मुंबई** - खुला प्रवर्ग - सर्वसाधारण (महिला)
- **ठाणे** - अनुसूचित जाती प्रवर्ग
- **मीरा-भाईंदर** - खुला प्रवर्ग - सर्वसाधारण (महिला)
- **कल्याण-डोंबिवली** - अनुसूचित जमाती प्रवर्ग
- **उल्हासनगर** - ओबीसी प्रवर्ग
- **वसई-विरार** - खुला प्रवर्ग - सर्वसाधारण
- **भिवंडी-निजामपूर** - खुला प्रवर्ग - सर्वसाधारण (महिला)
- **पनवेल** - ओबीसी प्रवर्ग
- **नाशिक** - खुला प्रवर्ग - सर्वसाधारण (महिला)
- **अहिल्यानगर** - ओबीसी प्रवर्ग - महिला
- **मालेगाव** - खुला प्रवर्ग - सर्वसाधारण (महिला)
- **जळगाव** - ओबीसी प्रवर्ग - महिला
- **धुळे** - खुला प्रवर्ग - सर्वसाधारण (महिला)
- **नागपूर** - खुला प्रवर्ग - सर्वसाधारण
- **अकोला** - ओबीसी प्रवर्ग - महिला
- **अमरावती** - खुला प्रवर्ग - सर्वसाधारण
- **चंद्रपूर** - ओबीसी प्रवर्ग - महिला
- **पुणे** - खुला प्रवर्ग - सर्वसाधारण (महिला)
- **पिंपरी-चिंचवड** - खुला प्रवर्ग - सर्वसाधारण (महिला)
- **सांगली** - खुला प्रवर्ग - सर्वसाधारण
- **कोल्हापूर** - ओबीसी प्रवर्ग
- **इचलकरंजी** - ओबीसी प्रवर्ग
- **सोलापूर** - खुला प्रवर्ग - सर्वसाधारण
- **छत्रपती संभाजीनगर** - खुला प्रवर्ग - सर्वसाधारण
- **परभणी** - खुला प्रवर्ग - सर्वसाधारण
- **जालना** - अनुसूचित जाती प्रवर्ग - महिला
- **लातूर** - अनुसूचित जाती प्रवर्ग - महिला
- **नांदेड** - खुला प्रवर्ग - सर्वसाधारण (महिला).

# जागतिक अर्थव्यवस्थेची माहितीही महत्वाची

## विरोधकांच्या टीकेला फडणवीस यांचे उत्तर

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**



जगातील राजकीय नेते इथे आहे. जगातील उद्योगांचे नेतृत्व करणारे इथे आहेत. जगातील नवीन शोध या ठिकाणी मांडण्यात आले आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता या ठिकाणी दाखवण्यात आल्या आहेत. जगाची अर्थव्यवस्था कशा पद्धतीने पुढे जाणार आहे, हे आपल्याला इथे शिकायला आणि त्यात सहभागी व्हायला देखील मिळते, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

दावोस दौऱ्यावरून होत असलेल्या टीकेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मौन सोडले. दावोस येथून संवाद साधत त्यांनी सध्याची भू-राजकीय परिस्थिती, आर्थिक घडामोडी आणि वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममधील सहभाग याबद्दलची भूमिका स्पष्ट केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या दौऱ्यात झालेल्या करारामुळे महाराष्ट्रात येऊ घातलेल्या गुंतवणुकीबद्दलही माहिती दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोसमधून बोलताना म्हणाले की, 'पहिल्यांदा तर मला हे सांगायचे आहे की, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमधील सहभाग का गरजेचा आहे. आपल्याला कल्पना आहे की, आजच्या भू-राजकीय परिस्थितीत ज्या प्रकारच्या आर्थिक घडामोडी घडत आहेत. त्या घडामोडींमध्ये तुम्हाला जर सुंसगत राहायचे असेल, तर तुम्हाला दावोस वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये असले पाहिजे.'

'देशाचे ग्रोथ इंजिन असलेला महाराष्ट्र वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचा भाग असलेच पाहिजे. ती संधी दिल्याबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो. या ठिकाणी दोन गोष्टी असतात. एक आपला सहभाग असतो. ज्यात द्विपक्षीय बैठका होतात. उद्योगपतींसोबत बैठका होतात. वेगवेगळ्या संवादात भाग घेऊन आपल्याला भारताची आणि आपल्या राज्याची भूमिका मांडता येते. त्या क्षेत्रातील जे जे नवीन घडत आहोत, त्यात आपण सध्या कुठे आहोत, या गोष्टी आपल्याला सांगता येतात. त्याचबरोबर अनेक गुंतवणुकीचे करारही या ठिकाणी होतात', अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# ओडिशात बीडी, गुटखा, तंबाखू, सिगारेट बंद

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था):**

**ओडिशा राज्याचा निर्णय**

ओडिशा सरकारने गुरुवारी राज्यात बिडी, सिगारेट, गुटखा, तंबाखू, खैनी व जर्दा यांसह सर्व प्रकारच्या अमली पदार्थांवर संपूर्ण बंदी घालण्यात आली आहे. केवळ विक्रीवरच नाही, तर पदार्थांचे उत्पादनावर, पॅकेजिंगवर व वितरणावरही बंदी घालण्यात आली आहे.

गुटखा, पान मसाला, जर्दा, खैनी यांसारख्या सर्व तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी असेल. फ्लेवर्ड, पॅकेज्ड व सुटी तंबाखू व ज्या खाद्यपदार्थांमध्ये तंबाखू किंवा निकोटीनचा अंश आहे, अशा सर्व उत्पादनांवर ही बंदी लागू असेल.

# राज्यपालांविरोधात 'सर्वोच्च'मध्ये जाण्याची सिद्धरामय्या यांची तयारी

## कर्नाटकातही राज्यपाल विरुद्ध राज्य सरकार संघर्ष चिघळला

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**



कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी राज्य विधानसभेत अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी अभिभाषणातील केवळ दोन ओळी वाचल्या आणि ते सभागृहातून निघून गेले. यामुळे मुख्यमंत्री सिद्धरामय्या नाराज झाले असून त्यांनी राज्यपालांच्या भूमिकेविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाण्याची भूमिका घेतली आहे.

राज्यपालांनी भाषणाच्या सुरुवातीला सर्व सदस्यांना अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी हिंदीत दोन ओळी वाचल्या. 'माझे सरकार राज्याच्या आर्थिक, सामाजिक व भौतिक विकासाचा वेग दुप्पट करण्यास कटिबद्ध आहे. जय हिंद, जय कर्नाटक', इतके वाचून राज्यपाल यांनी सभात्याग केला. यानंतर काँग्रेस सदस्यांनी नाराजी व्यक्त करत राज्यपालांविरोधात घोषणाबाजी केली. तामिळनाडू नंतर कर्नाटक राज्याचाही राज्यपालांशी असलेला संघर्ष उघड झाला आहे.

राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी सभागृहात भाषणाला मंजुरी देण्याआधी ११ उतारे हटविण्यास सांगितले होते. मात्र मुख्यमंत्री सिद्धरामय्या व मंत्रिमंडळाने त्यास नकार दिला होता.



स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या २३ जानेवारी रोजी असलेल्या जयंतीच्या निमित्ताने मुंबई महापालिकेच्या उद्यान विभागाकडून स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे स्मृतिस्थळ या ठिकाणी विविध फुलझाडांनी तसेच शोभिवंत झाडांनी सजावट केली आहे. यामध्ये सफेद आणि पिवळ्या रंगांच्या शेवंती, झेंडू, विविधरंगी जरबेरा, पोइनसेटिया इत्यादी फुलझाडांचा वापर करण्यात आला आहे. माल्फिजिया झाडाच्या टोपिअरी प्रकारातील कोन आकाराच्या कुंड्यांमधील झाडांचा वापर करण्यात आला आहे.

# मोदींप्रती मला आदर; ते माझे जवळचे मित्र!

## दावोसमधील आर्थिक परिषदेत ट्रम्प यांच्यांकडून कौतुकाचा वर्षाव

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. 'जवळचा मित्र' व 'उत्तम व्यक्ती' अशा शब्दांत ट्रम्प यांनी मोदींवर स्तुतिसुमने उधळली. उभय देशांमध्ये लवकरच व्यापार करार होईल असा आत्मविश्वास ट्रम्प यांनी यावेळी व्यक्त केला. वार्षिक आर्थिक परिषद, दावोस येथे ट्रम्प बोलत होते.

डोनाल्ड ट्रम्प यांनी मनीकंट्रोलशी साधलेल्या संवादात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी असलेले संबंध आणि दोन्ही देशांमधील व्यापार करारावर भाष्य केले. 'तुमच्या पंतप्रधानांप्रती मला खूप आदर आहे. ते उत्तम व्यक्ती असून माझे जवळचे मित्र आहेत. लवकरच आम्ही मोठा करार करू', असे ट्रम्प म्हणाले.

### ५० टक्के टॅरिफचा फटका

भारत – अमेरिकेतील व्यापारी संबंध ताणले असताना ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भाष्य करताना पॉलिसी केंद्रस्थानी ठेवत व्यक्तिगत टीका टाळल्याचे दिसून आले. अमेरिकेने भारतावर ५० टक्के टॅरिफ लादले आहे. भारतातील अमेरिकन राजदूत सरजिओ गोर यांनी दोन्ही देशातील संबंधावर सकारात्मक भाष्य केले आहे. व्यापारामुळे ताणलेले संबंध पूर्ववत होतील, असा विश्वास व्यक्त केला.

**शेअर बाजारात पडसाद :** ट्रम्प यांनी आयात शुल्काबाबत घेतलेल्या मवाळ भूमिकेचे सकारात्मक पडसाद भारतीय शेअर बाजारात उमटले. गेल्या तीन सत्रांपासून सुरू असलेल्या घसरणीला पूर्णविराम देत बाजार जोमाने सावरला. आयटी, फार्मा व मेटल क्षेत्रातील जोरदार खरेदीमुळे सेन्सेक्सने पुन्हा ८२ हजार ३०० चा टप्पा गाठला. बाजारात २ हजार ८०३ शेअर्समध्ये तेजी दिसून आली, तर १ हजार २३५ शेअर्स घसरणीसह बंद झाले. मिडकॅप व स्मॉलकॅप निर्देशांकांमध्येही प्रत्येकी १ टक्क्याची वाढ झाल्याने बाजारात सर्वसमावेशक मजबुतीचे संकेत मिळाले आहेत.

# चारही पीठांचे शंकराचार्य १९ वर्षांनी एकाच व्यासपीठावर येणार

## दिल्लीत गोमाता रक्षणासाठी १० मार्चला कार्यक्रम

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

ज्योतिषपीठ शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांच्या वादाची व्याप्ती वाढत चालली आहे. १९ वर्षांनी चार पीठांचे शंकराचार्य एकाच व्यासपीठावर येणार आहेत. १० मार्च २०१६ रोजी दिल्लीत गोमाता रक्षणासाठी मोठा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यात गोमाता राष्ट्रमाता अभियानाच्या मंचातून चारही शंकराचार्य एकत्र येण्याची शक्यता आहे.

अविमुक्तेश्वरानंद यांना याआधीच २ पीठांनी समर्थन दिले आहे. तिसऱ्या पीठाचे समर्थन मिळाल्यानंतर खरा-खोटा वाद मागे पडणार आहे. पुरी पीठाचे शंकराचार्य निश्चलानंद, अविमुक्तेश्वरानंद नावावर उघड सहमती आतापर्यंत देत नव्हते परंतु २ दिवसांपूर्वी माघ मेळ्यात अविमुक्तेश्वरानंद यांना त्यांनी लाडके म्हटले होते. गोरक्षणासाठी पुरी पीठाचे शंकराचार्य आधीपासून आंदोलन करत आहेत. पुरी पीठाचे शंकराचार्य निश्चलानंद यांनी गाईंच्या रक्षणाचे व्रत घेण्यासाठी आपले सिंहासन आणि छत्र त्यागले आहे. गोरक्षणाच्या विषयावर चारही शंकराचार्यांचे एकत्र येणे म्हणजे अविमुक्तेश्वरानंद यांच्यावर सर्व शंकराचार्यांची मान्यता असून सर्व शंकराचार्यांना आमंत्रणे देण्याची तयारी सुरू आहे.

यापूर्वी १९ मे २००७ रोजी, बंगळूरु येथे रामसेतू संदर्भात एक परिषद आयोजित करण्यात आली होती. ज्यामध्ये चारही पीठांच्या शंकराचार्यांनी एकाच व्यासपीठावर हजेरी लावली होती. शृंगेरी येथे पहिले चतुष्पीठ परिषद १७७९ आयोजित करण्यात आली होती.



**भूतकाळात गोरक्षणाशी संबंधित अनेक आंदोलने :** जर दिल्लीतील हा कार्यक्रम यशस्वी झाला, तर धार्मिक इतिहासात ही तिसरी वेळ असेल जिथं चारही पीठांचे शंकराचार्य एकाच व्यासपीठावर एकत्र दिसतील. हा सनातन परंपरेसाठी ऐतिहासिक क्षण असेल. भूतकाळात गोरक्षणाशी संबंधित अनेक आंदोलने झाली आहेत व स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांनी या मुद्द्यावर अनेकदा उघडपणे बोलले आहेत.

# बांगलादेशचा टी-२० वर्ल्ड कपवर बहिष्कार

## न खेळण्याच्या भूमिकेवर सरकार ठाम

◆ **ढाका (वृत्तसंस्था) :**

बांगलादेश सरकारने भारतात टी-२० वर्ल्ड कप खेळण्यास नकार दिला आहे. आयसीसीने बांगलादेशला इशारा देत भारतात टी-२० वर्ल्ड कप खेळावा लागेल, असे सांगितले होते. बांगलादेश सरकारच्या निर्णयानुसार बांगलादेश क्रिकेट बोर्डाने यापूर्वी त्यांचे सामने सुरक्षेच्या कारणामुळे श्रीलंकेत खेळवावेत, अशी मागणी केली होती. आयसीसीने बांगलादेश क्रिकेट बोर्डासोबत चर्चा केली होती. बांगलादेशच्या बोर्डाला २१ जानेवारीपर्यंत अंतिम निर्णय कळवण्यासाठी मुदत दिली होती. बांगलादेश त्यांच्या भूमिकेवर ठाम असून त्यांनी टी-२० वर्ल्ड कप खेळण्यास नकार दिला आहे. मुस्तफिजूर रहमानला आयपीएलमधून वगळल्याने बांगलादेश क्रिकेट बोर्डाने प्रतिष्ठेचा विषय केला आहे.

### श्रीलंकेत खेळण्याची मागणी

: बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या प्रतिनिधींनी टी-२० वर्ल्ड कपचे सामने श्रीलंकेत खेळायचे असल्याचे म्हटले आहे. मात्र, आयसीसीने बांगलादेशची मागणी धुडकावून लावली आहे. बांगलादेशने टी-२० वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतल्यानं आता त्यांच्या जागी स्कॉटलंडला संधी मिळण्याची शक्यता आहे.



### टी-२० वर्ल्ड कपवर बहिष्कार, बीसीबी आर्थिक संकटात सापडणार?

आयसीसी टी-२० वर्ल्ड कपमधील सहभागामुळे बांगलादेश क्रिकेट बोर्डाला जी रक्कम मिळणार होती, ती आता मिळणार नाही. बांगलादेश क्रिकेट बोर्डाला आयसीसीकडून आर्थिक दंड केला जाऊ शकतो. याशिवाय बीसीसीआयविरुद्ध गेल्याने बांगलादेशचे मोठे नुकसान होऊ शकते.

# डेमो सांगाड्यामुळे विमानतळावर गोंधळ

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल ३ वर गुरुवारी शोध मोहिमेदरम्यान मानवी सांगाड्यासारखी दिसणारी वस्तू आढळल्याने गोंधळ उडाला. दिल्ली पोलिसांनी हा सांगाडा फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवला आहे. तो वैद्यकीय विद्यार्थ्यांनी वापरला जाणारा डेमो सांगाडा असल्याचे उघड झाले. तो वैद्यकीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक उद्देशाने वापरला जातो. हा सांगाडा विद्यार्थ्याच्या सामानात सापडला, यामुळे त्याचा कोणत्याही गुन्हेगारी कारवायांशी संबंध नसल्याचे स्पष्ट झाले. कोणत्याही शंका दूर करण्यासाठी, दिल्ली पोलिसांनी सांगाडा फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवला आहे.